# नॉर्मन प्रिचर्ड


## विस्मृतीत गेलेले रत्न!

• • •

**डॉ. मिलिंद ढमढेरे,**
ज्येष्ठ क्रीडा समीक्षक
e-mail : dhamdheremilind28@gmail.com

अॅथलेटिक्स याला खेळांचा महाराजा असे म्हटले जाते. या खेळामध्ये ऑलिम्पिक क्रीडा स्पर्धेसारख्या प्रतिष्ठेच्या क्रीडा महोत्सवात पदकांची लयलूट करण्याची संधी असते. भारताच्या

नॉर्मन प्रिचर्ड यांनी सन १९०० मध्ये पॅरिस येथे आयोजित केलेल्या ऑलिम्पिक क्रीडा स्पर्धेत दोन रौप्यपदकांची कमाई केली. त्यांच्या या रुपेरी यशानंतर आजपर्यंत भारताला ऑलिंपिकमध्ये अॅथलेटिक्ससारख्या हुकमी क्रीडा प्रकारात पदक मिळवता आलेले नाही. काळाच्या ओघात नॉर्मन यांचे यश विस्मृतीत दडले गेले आहे.



पृथ्वीवरील सर्वात मोठा क्रीडा सोहळा म्हणून ऑलिंपिक स्पर्धेची ओळख आहे. आधुनिक ऑलिंपिकचे जनक म्हणून ओळख असलेले बॅरन डी कुबर्टीन यांच्या अथक प्रयत्नांनंतर अथेन्स येथे सन १८९६ मध्ये आधुनिक ऑलिंपिक स्पर्धेस प्रारंभ झाला. या स्पर्धेत मिळालेल्या चांगल्या प्रतिसादानंतर कुबर्टीन यांच्या शहरात म्हणजेच पॅरिस येथे दुसऱ्या ऑलिंपिक स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत भारतीय वंशाच्या नॉर्मन यांनी २०० मीटर धावणे आणि २०० मीटर अडथळा शर्यत या दोन क्रीडा प्रकारांमध्ये रुपेरी कामगिरी केली. ऑलिंपिक क्रीडा स्पर्धेत पदक मिळवणारे पहिले आशियाई खेळाडू म्हणूनही त्यांच्या नावावर अनोखी कामगिरी नोंदवली गेली.

फुटबॉलचे शहर असा नावलौकिक असलेल्या कलकत्ता शहरात नॉर्मन यांचा २३ जून १८७५ रोजी जन्म झाला. लहानपणापासूनच त्यांना अनेक खेळांची आवड होती. खासकरून फुटबॉल हा खेळ त्यांच्या नसानसात भिनला होता. जॉर्ज पीटर्सन व हेलन मेनार्ड यांनी आपला मुलगा नॉर्मन याला लहानपणापासूनच खेळांसाठी सतत प्रोत्साहन दिले.

शालेय स्तरावर नॉर्मन यांनी अनेक स्पर्धांमध्ये भाग घेत आपल्या शाळेला विजय मिळवून दिले होते. त्यानंतर महाविद्यालयीन स्तरावरही फुटबॉलवरील त्यांचे प्रेम कायम होते. सन १८९७ मध्ये सोबाबाजार विरुद्ध सेंट झेवियर्सकडून खेळताना त्यांनी नोंदविलेली हॅटट्रिक

ही त्या काळातील स्थानिक खुल्या स्पर्धांमध्ये नोंदवली गेलेली पहिली हॅटट्रिक होती असा उल्लेख केला जातो.

फुटबॉल मैदानावरील नॉर्मन यांचा धावण्याचा वेग आणि शैली पाहून त्यांच्या क्रीडा शिक्षकांनी ॲथलेटिक्स स्पर्धांमध्ये भाग घेण्याचा त्यांना सल्ला दिला. हा सल्ला मानून त्यांनी आंतरमहाविद्यालयीन मैदानी स्पर्धेत भाग घेतला. तसेच त्यांनी वेगवेगळ्या प्रांतांदरम्यान आयोजित केलेल्या मैदानी स्पर्धेत बंगाल प्रांताकडून भाग घेतला. सलग सहा वर्षे त्यांनी १०० यार्डस् अंतराच्या शर्यतीत प्रथम क्रमांक टिकविला होता. सन १८९८–९९ म्हणजे त्यांनी या शर्यतीत राज्य विक्रमाची नोंद केली. त्याखेरीज त्यांनी ४४० यार्डस् धावणे आणि १२० यार्डस् अडथळा शर्यतींमध्येही आपले कौशल्य सिद्ध केले.

महाविद्यालयीन शिक्षण पूर्ण झाल्यानंतर त्यांना कलकत्ता येथील एका व्यापारी पिढीमध्ये नोकरी मिळाली. नोकरी करीत असताना सन १९०० मध्ये तागाच्या कपड्यांच्या मार्केटिंगनिमित्त ते इंग्लंडला गेले होते. तेथे गेल्यानंतरही त्यांचे फुटबॉल आणि मैदानी स्पर्धा या क्रीडा प्रकारांवरील प्रेम अतूट राहिले होते. काम करीत असतानाच फावल्या वेळेत त्यांनी स्थानिक स्तरावरील फुटबॉल आणि मैदानी स्पर्धांमध्ये देखील भाग घेतला. विशेषतः धावण्याच्या शर्यतींवर त्यांनी अधिक लक्ष केंद्रित केले होते. या क्रीडा प्रकारांमधील त्यांची हुकूमत पाहून लंडन ॲथलेटिक्स क्लबने त्यांना आपले सदस्यत्व दिले. त्यामुळे त्यांचा उत्साह अधिकच द्विगुणित झाला. तेथे त्यांनी १०० यार्डस् व ४४० यार्डस् धावणे, १२० यार्डस् स्पर्धामध्ये भाग घेतला. या शर्यतींमध्ये त्यांनी अनेक ब्रिटिश अनुभवी खेळाडूंवर मात केली. या शर्यतींमध्ये त्यांनी बंगाल प्रांत ॲथलेटिक्स क्लबचे प्रतिनिधित्व केले होते. त्यांच्या कामगिरीचे कौतुक तेथील स्थानिक वृत्तपत्रांनीही भरभरून केले होते एक–दोन दैनिकांनी त्यांना 'दि इंडियन चॅम्पियन' अशी उपाधीही दिली होती.

पॅरिस येथे सन १९०० मध्येच ऑलिंपिक क्रीडा स्पर्धेविषयी तयारी सुरू झाली त्याचे वृत्त नॉर्मन यांच्या कानावर आले नाही तर नवलच. या स्पर्धेत उतरण्याचा निश्चय त्यांनी केला. त्यावेळी भारत देश स्वतंत्र झाला नव्हता. त्यामुळे त्यांनी या स्पर्धेत वैयक्तिक प्रवेशिका दिली होती. ६० मीटर्स, १०० मीटर्स, २०० मीटर्स धावणे, ११० मीटर्स व २०० मीटर्स अडथळा शर्यत या पाच शर्यतींमध्ये त्यांनी भाग घेतला. २०० मीटर्स अडथळा शर्यतीच्या पहिल्या प्राथमिक फेरीत त्यांनी २६.८ सेकंद वेळ नोंदवित ऑलिंपिक विक्रम नोंदविला. अंतिम फेरीत त्यांनी सर्वोत्तम कौशल्य दाखविण्याचा प्रयत्न केला, मात्र शेवटच्या टप्प्यात अमेरिकेच्या अल्विन क्रेंझेलीन यांनी त्यांच्यावर मात केली. क्रेंझेलीन यांनी हे अंतर २५.४ सेकंदात पार केले. नॉर्मन यांना हे अंतर पार करण्यास २६ सेकंद वेळ लागला. साहजिकच त्यांना रौप्य पदकावर समाधान मानावे लागले. अर्थात ही कामगिरी देखील त्यांच्यासाठी महत्त्वाची होती. २०० मीटर्स धावण्याच्या शर्यतीत विलक्षण चुरस पाहावयास मिळाली. अमेरिकेच्या वॉल्टर टेवेसबरी यांनी या शर्यतीत सुवर्णपदक जिंकताना २२.२ सेकंदांची वेळ नोंदवली. दुसऱ्या क्रमांकासाठी नॉर्मन आणि ऑस्ट्रेलियाचे स्टॅन रॉली यांच्यात अंतिम रेषेपर्यंत रंगतदार लढत झाली. नॉर्मन यांनी २२.८ सेकंदांत हे अंतर पार केले आणि आणखी एक रौप्यपदक आपल्या नावावर केले. रॉली यांना कांस्यपदक मिळाले. त्यांनी २२.९ सेकंदांत अंतिम रेषा ओलांडली.

नॉर्मन यांना या स्पर्धेतील अन्य क्रीडा प्रकारात पदक मिळवता आले नाही. ६० मीटर्स शर्यतीच्या प्राथमिक फेरीत त्यांना तिसरा क्रमांक मिळाला.

त्यांनी हे अंतर ७.१ सेकंदात पार केले. १०० मीटर्स धावण्याच्या शर्यतीत त्यांनी प्राथमिक फेरीत ११.४ सेकंद वेळ नोंदवली. पुढच्या फेरीत त्यांनी अकरा सेकंद वेळ नोंदवली, तथापि अंतिम फेरीसाठी त्यांना स्थान मिळवता आले नाही. ११० मीटर्स अडथळा शर्यतीच्या प्राथमिक फेरीत त्यांनी १६.६ सेकंद वेळ नोंदवली मात्र त्यांची ही कामगिरी अंतिम फेरीसाठी उपयुक्त ठरली नाही.

### नॉर्मन यांच्या पदकांबाबत वाद

नॉर्मन यांनी ज्यावेळी ऑलिंपिकमध्ये भाग घेतला होता त्यावेळी भारत देश ब्रिटिशांच्या अधिपत्याखाली होता. नॉर्मन यांनी लंडन येथे असताना ऑलिंपिकसाठी प्रवेशिका दिली होती. त्यामुळे त्यांची दोन्ही पदके आमचीच आहेत असा दावा ब्रिटिशांनी केला होता आणि अजूनही ते तसेच मानतात. मात्र आंतरराष्ट्रीय ऑलिम्पिक महासंघाने नॉर्मन हे भारताचे प्रतिनिधित्व करीत होते असे त्यांच्या अहवालात म्हटले आहे. ऑलिंपिक क्रीडा स्पर्धा संपल्यानंतर नॉर्मन भारतात परत आले. भारतामध्ये त्यांचे जोरदार स्वागत करण्यात आले. सन १९०० ते १९०२ या कालावधीमध्ये त्यांनी इंडियन फुटबॉल असोसिएशनचे सचिव म्हणून खूप सकारात्मक कामे केली.

### करिअरला वेगळीच कलाटणी

लॉर्ड कर्झन यांच्याकडे भारताची सूत्रे आल्यानंतर त्यांच्या सन्मानार्थ नवी दिल्ली येथे एक समारंभ आयोजित करण्यात आला होता. या समारंभाकरिता नॉर्मन यांनाही निमंत्रित करण्यात आले होते. या समारंभात सर चार्ल्स विनधॅम हे नॉर्मन यांना अभिनेतेच समजले. नॉर्मन यांनी स्वतःची ओळख करून दिल्यानंतर विनधॅम यांनी त्यांना नाट्य व सिनेक्षेत्रात त्यांनी काम करावे असा सल्ला दिला. बरेच दिवस विचार केल्यानंतर नॉर्मन यांनी नाट्यक्षेत्रात काम करण्याचा निश्चय केला आणि आणि सन १९०५ मध्ये ते इंग्लंडला गेले. तेथे त्यांनी अनेक नाटकांमध्ये काम केले. तथापि सिनेक्षेत्रात नाव कमवायचे असेल तर अमेरिकेत हॉलिवूडमध्ये दाखल व्हायला पाहिजे असा निश्चय करीत ते १९१४ मध्ये अमेरिकेला रवाना झाले. त्यांनी तेथे मुख्य चित्रपटांमध्ये आपल्या चेहऱ्याच्या आणि मूक अभिनयाच्या जोरावर रसिकांची मने जिंकली. अनेक मान्यवर कलाकारांसमवेत काम करण्याची त्यांना संधी मिळाली. नॉर्मन ट्रेवर याच नावाने त्यांनी सिने कलाकार म्हणून काम केले. त्यांनी अभिनेता म्हणून सव्वीस नाटकांमध्ये आणि सत्तावीस मुख्य चित्रपटांमध्ये काम केले. ३० ऑक्टोबर १९२९ रोजी त्यांनी इहलोकांची यात्रा संपवली.

नॉर्मन हे आज आपल्यात नाहीत तथापि त्यांनी ॲथलेटिक्समध्ये जी काही अतुलनीय कामगिरी केली आहे, ती कामगिरी लक्षात घेऊन आजच्या भारतीय धावपटूंनी ऑलिम्पिक क्रीडा स्पर्धेत पथकांची लयलूट केली तरच खऱ्या अर्थाने त्यांच्या स्मृतीचे जतन केल्याचे समाधान मिळेल.

❖ ❖ ❖

*Fitness is not about being better then someone else.*
*It's about being better than you used to be!*